# न्या य नि र्ण य

(दिनांक २१ मे, २०२६ रोजी घोषीत)

सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या वकीलांचा युक्तिवाद व पुराव्यावरुन खालील मुद्दे विवेचनार्थ उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक ०७/१०/२०२३ रोजी रात्री १.०० वाजता मौजे आर्णी, ता.आर्णी, जि.यवतमाळ येथे आरोपी हा दारुचे नशेत सार्वजनिक ठिकाणी दारु पिवुन धुमधाम करतांना मिळून आल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | ... नाही. |
| २ | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

२. आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एक साक्षीदार तपासला. न्यायालयामार्फत स्वतःहुन साक्षीदारांना समन्स पाठविण्यात आले. परंतू साक्षीदार गैरहजर राहील्याने तसेच जलदगतीने न्याय मिळणे हा आरोपीचा संविधानीक अधिकार असल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**वादप्रश्न क्र.१ करिताः–**

३. अभियोग पक्षातर्फे पंच म्हणून सैय्यद युसूफ सैय्यद कलंदर(अ.सा.क.१) यांना तपासण्यात आला. त्याने अभियोगपक्षाला पूरक साक्ष दिली नाही. आरोपीविरुध्द कोणताही भक्कम पुरावा अभियोगपक्ष अभिलेखावर आणू शकले नाही. आरोपीनी गुन्हा केल्याचे संशयापलिकडे जावुन सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीचा गुन्ह्यातील सहभाग दिसून येत नाही. त्यामुळे वादप्रश्न क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र.२ करिताः–**

४. अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे जाउन सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी निश्चितपणे निर्दोष सुटका होण्यास पात्र होत आहे. म्हणुन वादप्रश्न क्र.२ चा निष्कर्ष नोंदवितांना मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आ दे श

| | |
|---|---|
| १ | आरोपी पुनित सुभाष मजेठिया यास महा. दारुबंदी अधिनियम कलम ८५(१) नुसार शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातुन फौ. प्र. सं. क. २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत असून आरोपीस वर नमुद गुन्हयातुन मुक्त करण्यात येत आहे. |
| ३ | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे द्यावयाचा रक्कम रुपये १५,०००/–चा जामीन कदबा आज पासून पुढील ६ महिन्यांकरीता अस्तित्वात राहील. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)**

Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2026.05.21 15:36:40 +0530

दिनांकः २१/०५/२०२६ **(विशाल श्रावण धोंडगे)**
ठिकाणः आर्णी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

निकाल सांगितल्याचा दिनांक : २१/०५/२०२६
निकाल टंकलिखीत केल्याचा दिनांक : २१/०५/२०२६
निकालावर सही केल्याचा दिनांक : २१/०५/२०२६